# कुत्र्याचा चावा

उष्ण कटिबंधातील कुत्रे समशीतोष्ण कटिबंधातील कुत्रा प्रमाणे क्वचित पाळीव असतात. साहजिक ते सैरावैरा वाटेल त्या ठिकाणी हिंडणारे असतात. ते जरी रेबिस नावच्या रोगाने पछाडलेले नसले तरी त्यांच्या चाव्यामुळे रक्त दूषित होण्याचा दाट संभव असतो. म्हणून कोणास कुत्रा चावल्यास त्याच्या जीवनाला धोका आहे असे मानून ताबडतोब प्रथमोपचारी व वैद्यकीय मदतीची योजना करणे अगदी आवश्यक आहे. ते जनावर निरीक्षणाकरिता अडकून ठेवण्याचा प्रयत्न करावा. ( ही गोष्ट काळजीपूर्वक करावी.) जर त्याला रेबिस रोगाचा संसर्ग झाला असेल तर तो इतर लोकांना व जनावरांना घातक आहे. व त्याचा नाश करणे जरूरी आहे. जर त्याला ठार करायचे असेल तर त्याचे मस्तक सुरक्षित ठेवावे म्हणजे त्याच्या मेंदूची प्रयोगशाळेत तपासणी करून तो रेबिड म्हणजे रेबिस रोईगणे पछाडलेला होता किवा काय हे ठरवता येईल.



उपचार

1. वैद्यकीय इलाजाची एकदम व्यवस्था करा.



2. रक्तस्त्राव चालू ठेवा, रेबिज चे जंतु मध्यवर्ती मज्जा संस्थेपर्यंत मज्जा तंतु तर्फे पोहचतात मात्र सर्पदंशाप्रमाणे रक्ताभिसरणातून फैलावत नाहीत. म्हणून अवल पट्ट्यांची जरूरी नसली तरी पट्टा बांधल्याने रक्त सकलून जमा झाल्याने रक्तस्त्राव वाढविल्यास त्यांची मदत होते.
3. चावलेला भाग खालच्या बाजूने ठेवा.
4. पोट्याशीयम परम्यागनेट फिक्या द्रवाने शक्य असल्यास धुवून काढा.



5. जर कुत्रा रबीड होता ठाउक असेल तर तो चावल्यानंतर थोड्या मिनिटाच्या आत डॉक्टर न मिळाल्यास जखम जाळून टाका. हे कार्बोलिक किवा नाईट्रिक असिड सारख्या जाळणारा द्रव आगपेटील काड्याच्या किवा इतर टोकदार काठीच्या साहयाने जखमेत लावल्याने, चांगल्या प्रकारे होऊ शकते. सर्व जंतु मारण्याकरिता प्रतेक दाताच्या वर्णामध्ये जाळणारा द्रव पदार्थ घातला पाहिजे. जर कुत्रा चावून अर्धा तास झाला असेल तर जखम जाळणे जरूरी नाही.
6. जखमेवर कोरडे आच्छ्यादन द्या.